महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १०७ वा | दिनांक : २१/०१/२०२५ | वार : मंगळवार

## अजित पवारांच्या बीडच्या पालकमंत्री पदास विरोध



**जालना :** मराठा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे बीडचे पालकत्व देण्यास कडाडून विरोध दर्शवला आहे. त्यांनी या प्रकरणी सोमवारी जालन्याच्या दौऱ्यावर असणाऱ्या अजित पवारांना काळे झेंडे दाखवून आपला रोष व्यक्त केला. अजित पवार सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांना पाठिशी घालत असल्याचा आरोप या संघटनेने केला आहे.

बीड जिल्हा सध्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे चांगलाच चर्चेत आला आहे. येथील सर्वपक्षीय नेत्यांनी बीडचे पालकमंत्रीपद धनंजय मुंडे यांना देण्यास तीव्र विरोध केला. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या जिल्ह्याचे पालकत्व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवले. यामुळे सर्वकाही ठिकठाक झाल्याचे चित्र असतानाच भारतीय मराठा महासंघाने अजित पवार यांच्या पालकमंत्रीपदाला कडाडून विरोध दर्शवला आहे. अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्रीपद स्वीकारून एकप्रकारे ते धनंजय मुंडे यांना पाठिशी घालण्याचे काम करत आहेत, असा आरोप त्यांनी केला आहे.

अजित पवार सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यासाठी जालन्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी मराठा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या ताफ्याला शहरातील भोकरदन नाका परिसरात काळे झेंडे दाखवले. यावेळी त्यांनी मयत संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी या दोघांच्या कुटुंबीयांना न्याय देण्यासंदर्भात जोरदार घोषणाबाजी केली. अजित पवारांनी बीडचे पालकमंत्रीपद का स्वीकारले? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

संतोष देशमुख हत्या प्रकरणी चौफेर आरोप होणारे मंत्री धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या पक्षाचे आहेत. या खून प्रकरणाचा तपास कोणत्याही राजकीय दबावाशिवाय होण्यासाठी बीडचे पालकमंत्रीपद हे दुसऱ्या पक्षाच्या नेत्याकडे देण्याची गरज होती. पण अजित पवारांनी स्वतः हे पद स्वीकारल्यामुळे एका अर्थाने ते धनंजय मुंडे यांना पाठिशी घालण्याचे काम करत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांना काळे झेंडे दाखवून त्यांचा निषेध केला, असे भारतीय मराठा महासंघाचे आंदोलक अरविंद देशमुख यांनी म्हटले आहे.

अजित पवार यांचा ताफा शहरातील भोकरदन नाका येथून जाणार होता. त्यांचा ताफा या ठिकाणी पोहोचताच अचानक ४-५ आंदोलक त्यांच्या ताफ्यापुढे आले. त्यांनी काळे झेंडे दाखवून अजित पवारांचा निषेध केला. या अनपेक्षित घटनेमुळे तिथे बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिसांची एकच तारांबळ उडाली. त्यांनी आंदोलकांना रोखून धरण्याचा प्रयत्न करत अजित पवारांच्या ताफ्याला मार्ग करून दिला. अवघ्या काही मिनिटांच्या या आंदोलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

## गोपीनाथ मुंडे असते तर लाथ मारून हाकलून लावले असते - आ. देशमुख



**अकोला :** शिवसेना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख अकोला येथे जनआक्रोश मोर्चामध्ये सहभागी झाले होते. यावेळी बोलताना त्यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे असते तर धनंजय मुंडे यांना घरातूनच नव्हे तर जिल्ह्यातून लाथ मारून हाकलून लावले असते, अशा शब्दांत नितीन देशमुख यांनी हल्लाबोल केला आहे.

जनआक्रोश आंदोलनात बोलताना आमदार नितीन देशमुख म्हणाले, धनंजय मुंडे मंत्रीपदावर राहिले तर त्याचा फायदा वाल्मीक कराडला होईल. त्यामुळे मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी नितीन देशमुख यांनी केली आहे. वाल्मीक कराड हा धनंजय मुंडे यांचा मित्र आणि धनंजय मुंडे यांचे मित्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र संशयच्या भवऱ्यात आहे. महाभारतातील कर्णाप्रमाणेच धनंजय मुंडे त्याच्या मित्राला साथ देतील, अशी शंका यावेळी नितीन देशमुख यांनी उपासस्तहीत केली आहे.

दरम्यान, सध्या महाराष्ट्रात संतोष देशमुख हत्या प्रकरणी तसेच परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ जनआक्रोश मोर्चा काढण्यात येत आहे. या मोर्चात विरोधी पक्षातील अनेक नेते सहभागी होताना दिसत आहेत. तसेच मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. याचसोबत आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी लाऊन धरण्यात येत आहे. यासोबतच मंत्री धनंजय मुंडे हे वाल्मीक कराडला वाचवण्याचे परायत्न करत असल्याचा आरोप केला जात असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे.

मंत्री धनंजय मुंडे यांनी रविवारी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या शिबितरात वाल्मीक कराड याच्यासोबत आर्थिक हितसंबंध असल्याचा दावा फेटाळून लावला होता. या सर्व बातम्या खोट्या असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हंटले आहे. मात्र, प्रकाश सोळंके यांनी वाल्मीक कराड हा धनंजय मुंडे यांच्यामुळेच मोठा झाल्याचे म्हंटले आहे. धनंजय मुंडे यांच्याकडे साततत्याने बीडचे पालकमंत्री पद असल्यानेच जिल्ह्याची वाट लागली आहे. वाल्मीकला कोणी पोसले? तो कोणाचा माणूस आहे? धनंजय मुंडे यांच्यामुळे तो मोठा झाला, असे प्रकाश सोळंके म्हणाले आहेत.

## एमपीएससी परीक्षा पद्धतीत मोठा बदल

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या पद्धतीत महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. २०१२ पासून सुरू असलेली बहुपर्यायी परीक्षा पद्धत बंद करून यंदापासून वर्णनात्मक पद्धतीने परीक्षा घेण्यात येणार आहे.

या निर्णयाविरोधात स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी सूर्यकांत रोकडे आणि प्रवीण पाटील यांनी पत्रकार परिषदेत आपली नाराजी व्यक्त केली. त्यांच्या मते, २०११ पूर्वीची वर्णनात्मक पद्धत अनेक कारणांमुळे बंद करण्यात आली होती. ही पद्धत वेळखाऊ होती, गुणदान व्यक्तिनिष्ठ होते आणि विशिष्ट वैकल्पिक विषयांच्या विद्यार्थ्यांनाच वर्ग-१ च्या पदांवर नियुक्त्या मिळत होत्या.

विद्यार्थ्यांचा मुख्य आक्षेप हा की, युपीएससीच्या अंधानुकरणातून एमपीएससीचा अभ्यासक्रम अवाजवी वाढवला जात आहे. संपूर्ण देशात कोणत्याही राज्यात ९०० गुणांपेक्षा जास्त गुणांची राज्य लोकसेवा परीक्षा नाही, मात्र महाराष्ट्रात २०२५ गुणांची परीक्षा घेतली जात आहे. नायब तहसीलदार पदासाठी जिल्हाधिकारी पदापेक्षाही जास्त अभ्यासक्रम लादला जात आहे.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या बदलामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि मुलींच्या संधी मर्यादित होण्याची भीती आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांकडे वर्णनात्मक परीक्षेसाठी आवश्यक संसाधने उपलब्ध नाहीत किंवा आर्थिक परिस्थितीमुळे ते या संसाधनांचा लाभ घेऊ शकत नाहीत. विद्यार्थ्यांची मागणी आहे की, सध्याच्या अभ्यासक्रमात आवश्यक ते बदल करून बहुपर्यायी पद्धत कायम ठेवावी, जी अधिक पारदर्शक आणि निष्पक्ष आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ जानेवारी २०२५


## बलसुर येथे कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती



**उमरगा: (प्रा. नागसेन कांबळे)** तालुक्यातील बलसूर येथील श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालयात कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताहाच्या पहिल्या दिवशी सोमवारी (ता.२०) रोजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष तथा प्राचार्य एस.ए.आवताडे होते.

यावेळी उपमुख्याध्यापक रमेश चेंडकाळे, समितीचे सचिव तथा पर्यवेक्षक सतीश वाकडे, सदस्य जयचंद्र जादव, जयश्नी बुवा, प्रा. परमेश्वर सूर्यवंशी यांच्यासह माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व दहावी व बारावीचे विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य श्री. आवताडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जाताना आत्मविश्वासाने व भयमुक्त वातावरणात जाणे आवश्यक आहे. गैरमार्गाचा अवलंब करु नये. आपल्या परीक्षा केंद्रावर गैरमार्ग होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यावी. यावेळी बोलताना प्रा. सूर्यवंशी म्हणाले की, मंडळाने दिलेल्या सूचनेनुसार आपण १० वी व बारावीची परीक्षा द्यावी. प्रत्येक विषयाचा जास्तीत जास्त सराव करून चांगली गुणवत्ता प्राप्त करावी. सूत्रसंचालन प्रा.परमेश्वर सूर्यवंशी यांनी तर आभार श्री. एस.टी. गायकवाड यांनी मानले.

## जि. प. प्रा. शाळा टापरगावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा



**कन्नड (अरुण थोरात):** बाळासाहेब पवार वाचनालयातर्फे संपूर्ण तालुक्यातील सर्व माध्यमाच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेमध्ये जवळजवळ साडेतीनशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांमधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टापरगावची कुमारी प्रेरणा गणेश मोतिंगे या विद्यार्थिनीचा उत्तेजनार्थ क्रमांक आला प्रमाणपत्र व रोख रक्कम २५० रुपये असे बक्षिसाचे स्वरूप होते.

हे बक्षीस तीला सांगली जिल्ह्याचे मा. खासदार विशाल पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तिला या स्पर्धेसाठी असलेला चित्र विषय "माझ्या स्वप्नातील परी" यासाठी शाळेतील शिक्षिका छाया बाळकृष्ण माळवाळ व वर्षदा अनिल आवाळे यांनी मार्गदर्शन केले तर सहभागासाठी प्रेरणा शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा बाबूलाल पाटील यांनी दिली. तसेच सहकार्य शाळेच्या शिक्षिका माधवी नरेश गोंडाणे, स्वप्ना सोनवणे यांनी केले.






## रेल शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हास्तरीय पालक व विद्यार्थी क्रीडा स्पर्धेमध्ये व्हॉलीबॉलचे उत्कृष्ट पंच म्हणून कन्नड तालुका क्रीडा संकुल समन्वयक व रेल शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे यांना प्रशस्तीपत्र देऊन उत्कृष्ट काम केल्याबद्दल छत्रपती संभाजी नगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना व माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर शिक्षणाधिकारी योजना अरुणा भूमकर विस्तार अधिकारी संगीता साळवे आदी उपस्थित होते. उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रवीण शिंदे यांचा प्रशिष्ट्यपत्र देऊन गौरव करण्यात आला

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ जानेवारी २०२५


## २३ जानेवारीला केंद्रासह राज्यात राजकीय भूकंप होणार

**मुंबई :** येत्या २३ तारखेला राज्यात मोठा राजकीय भूकंप होणार असल्याचा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे यांनी केला आहे. ठाकरे गटाचे १५ व काँग्रेसचे १० आमदार आमच्या संपर्कात आहेत. त्यामुळे २३ जानेवारी रोजी राज्यात मोठा राजकीय भूकंप होईल, असे त्यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांनी केंद्रातही मोठा भूकंप होणार असल्याचा दावा केला.

राहुल शेवाळे सोमवारी म्हणाले की, २३ जानेवारीला एक मोठा स्फोट होण्याची शक्यता आहे. राजकीय भूकंप होण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे गटाचे १५ आमदार आमच्या संपर्कात आहेत. याशिवाय काँग्रेसचेही १० आमदार आमच्या संपर्कात आहेत. या प्रकरणी केंद्रातही राजकीय भूकंप होऊ शकतो. गेल्या कित्येक दिवसांपासून यासंबंधीच्या घडामोडी सुरू आहेत. याची कुठे ना कुठे तरी चाहूल लागल्यामुळे विजय वडेट्टीवार व संजय राऊत हे स्वत:चा अस्त वाचवण्यासाठी शिवसेनेवर एकनाथ शिंदे व उदय सामंत यांच्यात मतभेद असल्याचे बिनबुडाचे आरोप करत आहेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे लोकसभा निवडणुकीत राहुल शेवाळे यांचा शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई यांनी मुंबई दक्षिण - मध्य लोकसभा मतदारसंघातून मानहाणीकारक पराभव केला होता. त्यांच्या पराभवाने शिंदे गटाला जबर झटका बसला होता. तेव्हापासून राहुल शेवाळे काहीसे बॅकफूटवर गेल्याचे चित्र होते. पण आता ते पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत.

दुसरीकडे, विजय वडेट्टीवार यांनी भाजप एकनाथ शिंदे यांना संपवून उदय सामंत यांना पुढे आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा करून एकच खळबळ उडवून दिली आहे. एकनाथ शिंदे सध्या महायुतीत नाराज असल्याची चर्चा आहे. आपली नाराजी दाखवून ते आपल्या पदरात काहीतरी पाडून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. कारण, सध्या एकनाथ शिंदे यांची राजकीय परिस्थिती अत्यंत बिकट आहे. आज त्यांची गरज संपल्याचे चित्र आहे. त्यामुळे ते स्वत:हून बाजूला व्हावेत अशी स्थिती निर्माण केली जात आहे. भाजपने उद्धव ठाकरे यांना संपवून एकनाथ शिंदे यांना आणले. आता एकनाथ शिंदे यांना संपवून नवीन उदय पुढे येईल, असे ते मंत्री उदय सामंत यांच्याकडे अंगुलीनिर्देश करताना म्हणाले होते.

ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनीही या प्रकरणी भाजप व एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे. उदय सामंत हे अत्यंत फ्लेक्झिबल आहेत. अगोदर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये, नंतर शिवसेनेत, त्यानंतर शिवसेनेतून शिंदे गटात उद्या अजून काही चांगली ऑफर आली तर ते शिंदे गटातून फार चटकन फारकत घेऊन भाजपशी घरोबा करू शकतात. त्यामुळे अशा फ्लेक्झिबल चेहऱ्याला घेऊन भाजप निश्चितपणे एका नव्या समीकरणाचा उदय घडवून आणू शकते. या अर्थाने सुद्धा मला वाटते आत्ताची जी राजकीय मूव्ह सुरू आहे किंवा एकनाथ शिंदे यांचे रुसणे फुगणे सुरू आहे हे फार विचार करण्यासारखे आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

## डिजिटल साक्षरता ही काळाची गरज - प्रा. शिवाजी भोरे




**पाटोदा (प्रतिनिधी)** दि. २० जानेवारी: डिजिटल साक्षरता ही जागतिकीकरणात व स्पर्धेच्या युगात काळाची गरज आहे! असे प्रतिपादन प्रा.शिवाजीराव मोरे यांनी केले. ते बांगरवाडी येथे रासे हिरोच्या युवक विशेष शिबिरात उद्बोधन वर्गाच्या चौथ्या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की जागतिकीकरणामध्ये डिजिटल साक्षरता ही काळाची गरज आहे जोपर्यंत सर्वच क्षेत्रात आपण तंत्रज्ञानाचा वापर करणार नाही तो पर्यंत दराच्या मागे राहू म्हणून आपण सर्वांनी समाजातील प्रत्येक वर्गाला डिजिटल साक्षरता आल्या-शिवाय आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा पूर्णपणे उपयोग शकणार नाही म्हणून प्रत्येकाने स्वत: व इतरांना डिजिटल साक्षर करणे ही काळाची गरज आहे असे सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अशोक देवगुडे हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून क्रीडा विभाग प्रा. डॉ. प्रवीण शिलेदार हे होते तर व्यासपीठावर जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री.कुडके सर व्यासपीठावर उपस्थित होते.

या प्रसंगी प्रा.डॉ.प्रवीण शिलेदार व श्री.कुडके सर यांनी डिजिटल साक्षरता विषयी मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ अशोक देवगुडे यांनी सांगितले की डिजिटल साक्षरता ही देशाच्या प्रगतीची शक्ती आहे.

या कार्यक्रमाचे संचलन श्री. सुदर्शन काळे यांनी केले व श्री. दत्ता काळे यांनी आभार व्यक्त केले याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.बंडू लोखंडे व डॉ. शिवाजीराव काकडे व श्री. कुणाल काळे हे अथक परिश्रम घेत आहेत.

## अक्षय साधूसंत नव्हता ; पण एन्काउंटर चुकीचाच - सुषमा अंधारे

**मुंबई :** बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीचा अक्षय शिंदेच्या एन्काउंटर प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने ५ पोलिस अधिकाऱ्यांना जबाबदार धरले आहे. यावरून ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. अक्षय शिंदे हा कुणी साधूसंत नव्हता, पण एन्काउंटर चुकीचाच होता, असे त्या म्हणाल्या. आरोपीला शिक्षा देण्यासाठी आपल्याकडे न्यायव्यवस्था आहे. परंतु, कुणाला तरी वाचवण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी पोलिसांच्या संगनमताने अक्षय शिंदेचा खून केला, असा आरोपी त्यांनी केला.

अक्षय शिंदे हा कुणी साधूसंत, समाजसुधारक, क्रांतीकारी नेता नव्हता. तशीही त्याला कायद्याने सुद्धा मरेपर्यंत फाशीचीच शिक्षा झाली असती किंवा व्हायला हवी होती. मात्र, ही शिक्षा देण्यासाठी आपल्याकडे कायदा, न्यायालय आहे. ती शिक्षा देण्याचा अधिकार फक्त न्यायव्यवस्थेला आहे, असे म्हणत जबाबदार पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सुषमा अंधारे यांनी केली.

बदलापूरमध्ये अक्षय शिंदेचा एन्काऊंटर झाला होता तेव्हा पत्रकार परिषद घेऊन प्रश्न उपस्थित केले होते. या एन्काउंटर आक्षेप घेत अक्षय शिंदेचा एन्काउंटर हा फेक आहे. पोलिसांच्या संगनमताने राजकीय लोकांनी घडवून आणलेली ती हत्या आहे, असे मी त्यावेळी म्हटल्याचे सुषमा अंधारे यांनी सांगितले.

पुढे बोलतान सुषमा अंधारे म्हणाल्या की, फेक एन्काउंटर करण्याची गरज सरकार पक्षाला होती. निवडणुका तोंडावर होत्या, ज्या पद्धतीने भाजप किंवा एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात सरकारकडून वारंवार अक्षम्य चुका होत होत्या. स्वत:चे ग्लोरिफिकेशन करण्यासाठी, उद्दातीकरण करण्यासाठी एका आरोपीचा जीव घेण्यापर्यंत यांची मजल गेली, असा घणाघातही त्यांनी केला.

आपण बघितले असेल या सगळ्यानंतर ज्या पद्धतीची बॅनरबाजी केली गेली. लाडक्या बहिणींना न्याय दिला गेला, लाडक्या बहिणींचा देवाभाऊ वगैरे हे सगळे ग्लोरिफाय करण्यासाठी, आपली काळवंडत चाललेली प्रतिमा उजळ करण्यासाठी अक्षय शिंदेचा जीव घेतला गेला, असा आरोपही सुषमा अंधारे यांनी केला. स्वत:चा नाकर्तेपणा हे झाकण्यासाठी, महिलांना न्याय देऊ शकत नाही, हा नाकर्तेपणा झाकण्यासाठी अगतिकतेने आणि अतार्किकपणे उचलेले पाऊल आहे, असेही सुषमा अंधारे यांनी म्हटले.

माननीय उच्च न्यायालयाचे आभार मानते की, या निमित्ताने त्यांनी सरकार आणि पोलिस यांचे संगनमत उघड झाले आहे. अक्षय शिंदेने ज्या बंदुकीतून गोळी झाडली, त्या बंदुकीवर त्याच्या बोटांचे ठसे बंदुकीवर नाहीत, असे फॉरेन्सिकचा अहवाल सांगतो. अजून कुणाला तरी वाचवण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी जाणवीपूर्वक पोलिसांच्या संगनमताने अक्षय शिंदेचा खून केला, असा याचा स्पष्ट अर्थ आहे, असे म्हणत जबाबदार पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी सुषमा अंधारे यांनी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ जानेवारी २०२५


## वाल्मीक कराडच्या जामिनावरील सुनावणी पुन्हा लांबली

**बीड :** बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाशी संबंधित खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडच्या जामिनावरी सुनावणी कोर्टाने आज पुन्हा एकदा लांबणीवर टाकली. आज केज कोर्टापुढे ही सुनावणी होणार होती, पण कोर्टाने ऐनवेळी ती लांबणीवर टाकली. यामुळे जामिनाच्या प्रयत्नांत असणाऱ्या वाल्मीक कराडला जोरदार झटका बसला आहे. दरम्यान, बचाव पक्षाच्या वकिलांनी खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडविरोधात कोणताही पुरावा नसल्याचा दावा केला आहे.

वाल्मीक कराडचे वकील अशोक कवडे कोर्टाच्या सुनावणीपूर्वी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, वाल्मीक कराडने खंडणी मागितल्याचा किंवा त्यांना खंडणी देण्यात आल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यांचा या गुन्ह्याशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध नाही. पण माध्यमांच्या दबावामुळे नाहक त्यांना या प्रकरणी गोवण्यात आले आहे.

वाल्मिक कराडला खंडणीच्या गुन्ह्यात १४ जानेवारी रोजी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर आम्ही तत्काळ जामिनासाठी याचिका दाखल केली. त्यावर कोर्टाने सरकारी पक्ष व तपासी अधिकाऱ्यांचे उत्तर मागितले. सरकारी पक्षाने आपले उत्तर दाखल केले आहे. या प्रकरणी १८ जानेवारी रोजी सुनावणी होणार होती. मात्र माझी प्रकृती ठीक नसल्यामुळे ही सुनावणी आज सोमवारी होणार होती.

हे प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर चालणार आहे. या प्रकरणी न्यायालयात जोरदार युक्तिवाद होईल. न्यायालय आमची बाजू ऐकून घेईल. या दोन - तीन बाबी विचारात घेऊन आम्हाला जामीन मिळेल असा अंदाज आहे. आमच्या पक्षकाराचा न्यायालयावर विश्वास आहे. त्यांच्यावरील १४ गुन्ह्यांपैकी ११ ते १२ गुन्ह्यातून त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे. एक ते दोन गुन्हे राजकीय आंदोलनाच्या संदर्भात परळी न्यायालयात प्रलंबित आहेत. ही यादी वाल्मीक कराड यांनी स्वतःहून दाखल केली आहे, असेही वकील अशोक कवडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

बचाव पक्षाच्या वकिलांनी यावेळी संतोष देशमुख हत्याकांड व खंडणीच्या गुन्ह्याचा वाल्मीक कराडशी संबंध आहे किंवा नाही याचा खुलासा तपास अधिकारी करतील असेही सांगितले. संतोष देशमुख हत्या व खंडणीच्या गुन्ह्याशी वाल्मिक कराड यांचे कनेक्शन आहे की नाही? या गुन्ह्यासंदर्भात त्यांच्याकडे तसे पुरावे आहेत का नाही? हे तपासी अधिकारी कोर्टसमोर स्पष्ट करतील, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे वाल्मीक कराडने खंडणी प्रकरणात गत ३१ डिसेंबर रोजी पुण्यातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पण केले होते. त्यानंतर आता त्याच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे त्याला जामीन मिळणे अवघड असल्याचे सांगितले जात आहे. पण प्रत्यक्ष न्यायालयात काय होते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## पुण्यात उद्योजकावर भरदिवसा गोळीबार

**पुणे :** पुण्यातील चाकण एमआयडीसीमध्ये एका उद्योजकावर गोळीबार केल्याची घटना समोर आली आहे. दोन जणांनी स्टील कंपनीच्या मालकावर गोळ्या झाडल्या. भरदिवसा हा प्रकार घडल्याने एकच खळबळ उडाली. या हल्ल्यात अजय सिंग हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. हल्ला केल्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, हा हल्ला खंडणीच्या उद्देशाने करण्यात आल्याची चर्चा सुरू आहे.

अजय सिंग यांची पुण्यातील चाकण एमआयडीसीमध्ये कंपनी आहे. स्मॉल स्केल इंडस्ट्रीजमधील कैलास स्टीलचे ते मालक आहेत. अजय सिंग हे आज सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास कंपनीत आले होते. कंपनीबाहेर थांबले असता दुचाकीवरून आलेल्या अज्ञात दोघांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात अजय सिंग हे जखमी झाले असून त्यांना दोन गोळ्या लागल्या आहेत. त्यांच्या पोटात एक गोळी तर दुसरी गोळी पाठीत लागलेली आहे. या घटनेनंतर कंपनी मालक अजय सिंग यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

या प्रकरणी पिंपरी चिंचवडचे डीसीपी डॉ. शिवाजी पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, खंडणीच्या उद्देशाने हा हल्ला करण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र, जखमी असलेल्या कंपनी मालकांनी तशी मागणी कोणाकडूनही झाली नसल्याचे सांगितले. अजय सिंग यांच्यावर सकाळी पावणे अकरा-अकराच्या सुमारास हा हल्ला करण्यात आला. दोघांकडून हा गोळीबार करण्यात आला आहे. आरोपीच्या शोधासाठी पोलिस व गुन्हे शाखेचे १० ते १२ पथक कार्यरत झाले आहेत. कंपनीचे मालक प्रत्यक्ष जखमी व कंपनीतील इतरांशी आम्ही चौकशी केली असून हा हल्ला खंडणी किंवा व्यवसायातून झालेला नाही, असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, याप्रकरणात हल्लेखोराचा नेमका हेतू काय, याचा तपास आम्ही करत असल्याचे डीसीपी शिवाजी पवार म्हणाले.

विद्येचे माहेरघर असणाऱ्या पुणे जिल्ह्यात गेल्या काही वर्षात गुन्हेगारी चांगलीच वाढली आहे. हत्या, कोयता गँग, महिलांवरील अत्याचार अशा बातम्या वाचण्यात येत आहेत. राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी गेल्या आठवड्यात पुणे जिल्ह्याला भेट देऊन पोलिसांसोबत चर्चा केली. गुन्हेगारांवर वचक बसवण्याचे निर्देश त्यांनी पोलिसांना दिले होते. मात्र, आज पुण्यातील चाकण एमआयडीसी परिसरात भर दिवसा एका उद्योजकावर गोळीबाराची घटना घडल्यामुळे पुण्यात नेमके चाललंय काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

## शहांवर टिप्पणीप्रकरणी राहुल गांधींवर गुन्हा दाखल होणार नाही



**रांची :** राहुल गांधींविरोधात सुरू असलेल्या मानहानीच्या खटल्यातील ट्रायल कोर्टाच्या कामकाजाला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने झारखंड सरकार आणि भाजप नेत्याला नोटीस बजावली आहे आणि त्यांची प्रतिक्रिया मागवली आहे.

२०१९च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी झारखंडमधील चाईबासा येथे भाषणादरम्यान गांधींनी शहा यांना खुनी म्हटले होते. यानंतर भाजप कार्यकर्ता नवीन झा यांनी २०१९ मध्ये अमित शहा यांच्या विरोधात अपमानास्पद वक्तव्य केल्याबद्दल राहुल गांधींविरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता.

सुनावणीदरम्यान, राहुल यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी युक्तिवाद केला की अनेक न्यायालयीन निर्णयांमध्ये असे म्हटले आहे की केवळ पीडित व्यक्तीच फौजदारी मानहानीची तक्रार दाखल करू शकते. त्रयस्थ व्यक्तीच्या वतीने तक्रार दाखल करण्यात आली होती. मानहानीच्या खटल्यात असे करणे मान्य नाही.

सिंघवी यांनी विचारले - तुम्ही पीडित व्यक्ती नसल्यास, तक्रार दाखल करण्यासाठी तुम्हाला प्रॉक्सी कशी मिळेल?

### २०१८ मध्येही राहुल यांनी शाह यांना खुनी म्हटले होते

२०१८ मध्येही चाईबासा येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात राहुल म्हणाले होते की, 'भाजपमधील कोणताही खुनी राष्ट्रीय अध्यक्ष होऊ शकतो. त्यावेळी शहा हे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. राहुल यांच्या या वक्तव्यानंतर भाजप युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रताप कटियार यांनी चाईबासा येथील सीजेएम कोर्टात केस दाखल केली होती.

### रांचीच्या खासदार-आमदार न्यायालयात वर्ग करण्यात आले प्रकरण

चाईबासा येथे दाखल केलेला खटला रांचीच्या खासदार-आमदार न्यायालयात सुनावणीसाठी वर्ग करण्यात आला. नंतर चाईबासा येथे खासदार-आमदार न्यायालय सुरू झाल्यानंतर ते पुन्हा चाईबासा येथे वर्ग करण्यात आले. येथील सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती ऋषी कुमार यांनी राहुल गांधी यांची याचिका फेटाळून लावली आणि हजर राहण्याची नोटीस दिली.

### २०१४ ते २०२२ पर्यंत राहुल गांधींवर मानहानीचे खटले...

२०१४ मध्ये राहुल गांधी यांनी आरएसएसवर महात्मा गांधींच्या हत्येचा आरोप केला होता. संघाच्या एका कार्यकर्त्याने राहुल गांधींविरुद्ध आयपीसीच्या कलम ४९९ आणि ५०० अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. महाराष्ट्रातील भिवंडी न्यायालयात हा खटला सुरू आहे.

२०१६ मध्ये, आसाममधील गुवाहाटी येथे कलम ४९९ आणि ५०० अंतर्गत राहुल गांधींविरोधात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. फिर्यादीनुसार, राहुल गांधी म्हणाले होते की, संघाच्या सदस्यांनी मला आसाममधील १६व्या शतकातील वैष्णव मठ बारपेटा सत्रामध्ये प्रवेश दिला नाही. यामुळे संघाची प्रतिमा खराब झाली आहे. हे प्रकरणही न्यायालयात प्रलंबित आहे.

२०१८ मध्ये झारखंडची राजधानी रांचीमध्ये राहुल गांधींविरोधात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला होता. रांचीच्या उपविभागीय न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात हे प्रकरण सुरू आहे. आयपीसीच्या कलम ४९९ आणि ५०० अंतर्गत राहुल गांधींविरुद्ध २० कोटी रुपयांचा मानहानीचा खटला दाखल करण्यात आला आहे. यामध्ये राहुल यांच्या विधानावर आक्षेप घेण्यात आला, ज्यात त्यांनी 'मोदी चोर है' असे म्हटले होते.

२०१८ मध्येच महाराष्ट्रात राहुल गांधींवर आणखी एक मानहानीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. माझगाव येथील शिवरी न्यायालयात हा खटला सुरू आहे. आयपीसी कलम ४९९ आणि ५०० अंतर्गत मानहानीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युनियनच्या एका कार्यकर्त्याने गुन्हा दाखल केला होता. गौरी लंकेश यांच्या हत्येचा संबंध भाजप आणि संघाच्या विचारसरणीशी जोडल्याचा राहुल यांच्यावर आरोप आहे.